# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक १५/०७/२०१७ (शनिवार)
# (दुपार)

---

## अवैधरीत्या देशी दारुची
## वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

पो.स्टे. सावनेर :- अंतर्गत १० किमी अंतरावर तेल कामठी, सावनेर रोड येथे दिनांक १४/०७/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा,ना.ग्रा हे पो. स्टे खापा येथील गुन्हयातील आरोपी शोध कामी पो. स्टे सावनेर येथे फिरत असतांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम हा इंडिका कार क्र- एम.एच- ३१/ सी.एम-१८१४ मध्ये देशीदारूची वाहतुक करीत आहे, अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने घटनास्थळी जावुन कारचा पाठलाग केला असता व त्यांना थांबवून चेक केले असता कार मधील आरोपी नामे- प्रविण तेजराव देशमुख, वय ३० वर्ष, रा. तेल कामठी त्यांच्या कडुन विनापरवाना व अवैधरीत्या २ पेटया देशीदारु किंमती ६,७२०/- रू. व इंडिका कार क्र- एम.एच- ३१/ सी.एम-१८१४ किंमती २,२०,०००/- रू. असा एकुण वाहनासह किंमती २,२६,७२०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- सरकारतर्फे पोलीस सफौ श्री. लक्ष्मी प्रसाद दुबे, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ६५ (अ), (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. गडेकर हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पुरंदरे, सफौ श्री. लक्ष्मी प्रसाद दुबे, पोहवा श्री. निलेश बर्वे, पोना सत्यशिल कोठारे, पोशि प्रणय बनाफर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



## चोरी

**पो.स्टे. कन्हान** :- अंतर्गत १० किमी. अंतरावर नविन गोंडेगाव ओटीएम डंपींग वेकोली या ठिकाणी दिनांक १४/०७/२०१७ चे ०८.०० वा. पुर्वी आरोपी नामे- १) भुजंग महल्ले, रा. टेकाडी २) विनोद सोमकुवर, रा.गोंडेगाव व एक अनोळखी इसम यांने संगणमत करून वेकोली खदानचे डंपींग यार्ड मधुन अंदाजे ५० टन कोळसा किंमती १,५०,०००/-रूपया चा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे-लतीफ समसुद्दीन अंसारी, वय ५२ वर्ष, रा. सुरक्षा रक्षक, कामठी कॉलेरी, यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांनविरुध्द कलम ३७९,३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. रविन्द्र गायकवाड हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**